नि.फौ.ख.क्र. ११४/२०१८
सरकार वि. मो. जलील वगैरे
**निशाणी क्र.०९**

सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – अक्षय मनोहर राजगिरे
वय – २७ वर्ष धंदा – पानटपरी
पत्ता – राम मंदिर चौक, मच्छीपुल, कामठी, जि. नागपूर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे**

१. दि.२३/०२/२०१८ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले नव्हते. पोलीसांनी माझी सही पोलीस स्टेशनला घेतली होती. आता मला समन्स दाखविला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीस **निशाणी १०** देण्यात येते. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतीही पंचनाम्याची कार्यवाही केली नाही व काहीही जप्त केले नाही. आता मला घटनास्थळ / जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीस **निशाणी ११** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २३/०२/२०१८ रोजी पोलीसांनी मला खैरी फाटयाजवळ पंचनाम्यासाठी बोलवीले होते. हे म्हणणे खरे नाही की त्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ / जप्ती पंचनामा तयार केला, मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**सदर साक्षीदाराचा पुरावा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ अन्वये नोंदविण्यात आला करीता उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

सही/–
**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –१२/०१/२०२४